नागपूर जिल्हा “पर्यटन जिल्हा”
म्हणून घोषित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०२६/०५/प्र.क्र.८१/पर्यटन-१**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : १५ सप्टेंबर, २०२६.**

<u>वाचा</u> :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.टीडीएस २०१५/११/ प्र.क्र.१०२१/पर्यटन, दिनांक ०४/०५/२०१६.
२) जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.जिनिस/२०२६/८५, दिनांक ०७/०५/२०२६.
३) संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.प.सं./विकास/नागपूर पर्यटन जिल्हा/१/प्र.क्र.५/२०२६, दिनांक २२/०६/२०२६.

<u>प्रस्तावना</u> :-

नागपूर जिल्हा हा प्राचीन काळापासून ऐतिहासिक, भौगोलिक, नैसर्गिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेला अत्यंत समृद्ध प्रदेश आहे. नागपूर हे महाराष्ट्राची उपराजधानी असून राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आणि भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात हरित शहर (Greenest City) म्हणून ओळखले जाते.

२. भौगोलिकदृष्ट्या हे शहर भारताच्या अगदी मध्यवर्ती भागात असून येथून मुंबई, दिल्ली आणि कोलकाता ही महानगरे समान अंतरावर आहेत. देशोदेशीच्या रस्ते वाहतुकीचे मध्यवर्ती केंद्र आणि राष्ट्रीय महामार्गांचा केंद्रबिंदू असलेल्या या शहरातच ब्रिटिश काळात स्थापित झालेला ऐतिहासिक "शून्य मैलाचा स्तंभ" (Zero Mile Stone) म्हणजेच देशाचा राष्ट्रीय मध्यवर्ती केंद्रबिंदू अस्तित्वात आहे.ऐतिहासिक दृष्टिकोनातून, नागपूर हे गोंड राजे आणि भोसले राजघराण्याचे सत्ताकेंद्र राहिले असून येथे विस्तीर्ण गोंड व भोसले कालीन विविध ऐतिहासिक वास्तू व किल्ले दिमाखात उभे आहेत. तसेच, जागतिक स्तरावर "संत्र्यांचे शहर" (Orange City) म्हणून प्रसिद्ध असलेल्या या जिल्ह्याला अद्वितीय नैसर्गिक वैभव लाभले आहे.

३. भौगोलिक व नैसर्गिक दृष्टिकोनातून, नागपूरला भारताची "व्याघ्र राजधानी" (Tiger Capital of India) म्हणून ओळखले जाते, कारण या जिल्ह्याच्या परिसरात पेंच राष्ट्रीय उद्यान, उमरेड-कऱ्हांडला यांसारखी जागतिक दर्जाची अभयारण्ये आणि व्याघ्रप्रकल्प आहेत.

४. नागपूर जिल्ह्याचे वित्तीय व गैरवित्तीय महत्त्व लक्षात घेऊन, पर्यटन धोरण २०१६ प्रकरण ९ (१) अंतर्गत नागपूर जिल्ह्यास विशेष पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

५. धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाचा विचार करता, रामटेक येथील पुरातन राम मंदिर, शहराजवळील खिंडसी येथील जलक्रीडा केंद्र (Water Sports) आणि ऐतिहासिक दीक्षाभूमी ही पर्यटकांची प्रमुख आकर्षणे आहेत.विस्तीर्ण व सदाबहार उद्याने, समृद्ध लोककला, हस्तकला

प्रदर्शने आणि आदिवासी लोकनृत्यांचे केंद्र असलेल्या नागपूर जिल्ह्याची ही अफाट पर्यटन क्षमता, भौगोलिक महत्त्व आणि ऐतिहासिक वारसा लक्षात घेता, पर्यटन धोरण-२०१६ प्रकरण ९ (१) अंतर्गत नागपूर जिल्हयास "विशेष पर्यटन जिल्हा" घोषित करण्यात आला असल्याच्या धर्तीवर नागपूर जिल्ह्यास **"पर्यटन जिल्हा"** म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्राची उपराजधानी, संत्रानगरी आणि राज्याची व्याघ्र राजधानी म्हणून वैशिष्ट्यपूर्ण ओळख असलेल्या नागपूर जिल्ह्यातील समृद्ध नैसर्गिक, वन्यजीव, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन संपदेचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने तसेच पर्यटनाला चालना देऊन स्थानिक रोजगारनिर्मिती व आर्थिक विकासास गती देण्यासाठी, पर्यटन धोरण-२०१६ अंतर्गत नागपूर जिल्हयास "विशेष पर्यटन जिल्हा" घोषित करण्यात आला असल्याच्या धर्तीवर नागपुर जिल्ह्यास या शासन निर्णयान्वये पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१५१४४८५७७३५० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH V ROKADE

Digitally signed by SANTOSH V ROKADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=CA5751FFEDBB005FDFF34AB6AC1F8319D061483D7D35E20F744E251360F7920A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ECF4A9ABE84C70DE989C3669424C12B6CADCB583D500FE489CE8727916E0BBEE, cn=SANTOSH V ROKADE
Date: 2026.09.15 14:50:07 +05'30'

**(संतोष जया विठ्ठल रोकडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग) यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग) यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७) मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

९) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

१०) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई

११) अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

१२) महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१३) महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१४) महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
१५) संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
१७) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१८) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१९) जिल्हाधिकारी, नागपूर
२०) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
२१) नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
२२) वित्त विभाग (का.व्यय-१५/ अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
२३) अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई
२४) निवडनस्ती (पर्यटन-१)

***